**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित**
**ग्राहक तक्रार निवारण मंच**
**कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर**

MAHADISCOM
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

सं.क्र.काअ/ग्रातनिमं/कोप/केस क्र. २२/२०१७-१८/२९४ दिनांक: १२.१०.२०१७

**आदेश**

**आदेश केस क्र. २२/२०१७-२०१८**

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. अस्लम गफार कलईगार<br>मु.पो. चांबुकस्वार मशिदीच्या मागे<br>कुरुदवाड ता. शिरोळ , जि. कोल्हापूर : | **तक्रार अर्जदार (ग्राहक)** |
| | **विरुध्द** | |
| १) | कार्यकारी अभियंता (का) तथा नोडल ऑफीसर,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>मंडल कार्यालय, कोल्हापूर | |
| २) | कार्यकारी अभियंता,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>विभागीय कार्यालय जयसिंगपूर | **विरुध्द पक्षकार** |
| ३) | उपकार्यकारी अभियंता,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>उपविभाग कुरुदवाड | |

**कोरमः-** १. श्री. प्र.वि. खपली, सदस्य सचिव,
२. श्री. पी. एस. बुरांडे, ग्राहक सदस्य,

CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM, KOLHAPUR ZONE MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD. महावितरण

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

**निर्णय**

मी प्र.वि.खपली सदस्य सचिव, ग्राहक तक्रार-निवारण मंच. कोल्हापूर, खालीलप्रमाणे निर्णय देत आहे.

१) तक्रारदार श्री अस्लम गफार कलईगार रा. कुरुदवाड ता. शिरोळ, जि. कोल्हापूर यांचे गट क्र. २७८ मधील खाजगी जागेतील प्लॉटमध्ये रोहित्र बसविलेला असून तो नागरी वस्तीमध्ये असल्यामुळे तेथील नागरिकांच्या जिवीतास धोका निर्माण झाल्यामुळे सदर रोहित्र स्थळ तेथून ताबडतोब स्थलातंरीत करण्याबाबतची तक्रार अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, कोल्हापूरकडे त्यानी दिनांक २०.०३.२०१७ रोजी दाखल केली होती. परंतु अंतर्गत कक्ष कोल्हापूर यांनी दि. ०४.०५.२०१७ रोजीच्या आदेशाने त्यांची मागणी फेटाळून लावली आहे. त्यामुळे सदर तक्रार मंचाकडे दि. ०३.०६.२०१७ रोजी दाखल केली.

२) सदर तक्रारीची सुनावणी दि. ११.१०.२०१७ रोजी या मंचासमोर घेण्यात आली. सुनावणी दरम्यान ग्राहक स्वत: व त्यांचे प्रतिनिधी श्री प्रभाकर आण्णाप्पा बंडगार उपस्थित होते. वि.प. तर्फे श्री मकरंद दे.आवळेकर, कार्यकारी अभियंता जयसिंगपूर व श्री एस.आय. मुल्ला उपकार्यकारी अभियंता , कुरुदवाड उपविभाग उपस्थित होते.

## गा-हाण्याचे संक्षिप्त स्वरुप.

३) तक्रारदार यांचे म्हणणे असे की, माझे खाजगी जागेमधील धोकादायक रोहित्र स्थळ नगरपरिषदने संमती दिलेल्या नेमक्या जागेवर हलविण्यात यावे.

४) २ वर्षापासून सतत पाठपुरावा करुन देखिल तक्रारीची दखल न घेणा-या अधिकारी व कर्मचारी यांचेवर कारवाई करण्यात यावी .

५) त्यामुळे मला झालेल्या मानसिक व शारिरीक त्रासापोटी नुकसान भरपाई मिळणेत यावी.

## वि. प. यांची भूमिका.

६) वि.प. तर्फे श्री एस.आय. मुल्ला यांनी सदर रोहित्र स्थळ हे ३२ वर्षापूर्वी म्हणजे १९८५ पूर्वी बसविलेले आहे. व त्यावेळेस ती जागा मोकळी असल्यामुळे तिथे रस्ता किंवा प्लॉट तत्सम सिमा असे काहीही उपलब्ध नव्हते. सदर जागेवर प्लॉट नंतर पाडण्यात आले असून श्री असलम गफार कलईगार यांनी तो भुंखड खरेदी करण्याचे आधीच त्या जागेवर रोहित्र बसविलेला होता. असे असताना देखिल सदर रोहित्र नगरपरिषदेने दिलेल्या मोकळया जागेवर स्थलांतराबाबतचे अंदाजत्रक EE/JSP/Maint/KWD/५८७/१५-१६ या क्रमांकने DPDC या योजने अंतर्गत निधी मंजूरी करिता पाठविण्यात आले आहे. DPDC अंतर्गत निधी मंजूर झालेवर वरील रोहित्र हलविण्याचे काम ताबडतोब हाती घेण्यात येईल.

७) या संदर्भात वि.प. यांनी मा. विद्युत लोकपाल केस क्र. ९१/२००८ मध्ये दि. २१.०१.२००९ रोजी दिलेल्या आदेशाची प्रत सादर केली . त्यामध्ये विद्युत वाहिनी/रोहित्र स्थलांतर करणेबाबतची ग्राहकांची खर्चाची मागणी फेटाळलेली आहे. सुनावणी दरम्यान ग्राहक प्रतिनिधी व वि.प. तर्फे केलेले युक्तिवाद ऐकणेत आले तसेच दिलेल्या सर्व कागदपत्राची पडताळणी करण्यात आली.

या मंचाच्या निर्णयासाठी खालील मुद्दे उपस्थित होत आहेत.

CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM, KOLHAPUR ZONE
MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD.
महावितरण

१) तक्रारदार यांना त्यांच्या मागणीनुसार रोहित्र नगरपरिषदेच्या मोकळया जागेवर हलविता येईल काय?

उत्तरः- होय. नियमाप्रमाणे.

२) याबाबत झालेल्या दिरंगाई बाबत संबंधित कर्मचा-यावर कारवाई करता येईल काय?

उत्तरः- नाही.

३) ग्राहकास झालेल्या मानसिक त्रासापोटी नुकसान भरपाई देणे योग्य होईल काय?

उत्तरः- नाही

४) कोणता अंतिम आदेश?

उत्तरः- शेवटी नमूद केल्याप्रमाणे.

## कारणमिमांसा

८) मा.वि.लो यांनी केस क्र९१/२००८ मध्ये अशा प्रकारच्या खर्चाची ग्राहकाची मागणी फेटाळली आहे. तक्रारदार श्री असलम गफार कलईगार रा. कुरुदवाड ता. शिरोळ जि. कोल्हापूर गट क्र. २७८मधील प्लॅाटमध्ये त्यानी तो विकत घेण्यापूर्वीच रोहित्र बसविण्यात आलेला आहे. त्यामुळे तो त्यांना हलविण्याचा झाल्यास त्याबाबत येणारा खर्च नियमाप्रमाणे करावा लागेल. असे असताना सुध्दा सदरच्या जागेवरील रोहित्र स्थलांतराचे अंदाजपत्रक क्र. EE/JSP/Maint/KWD/५८७/१५-१६ दिनांक १५.०३.२०१६ नुसार मंजूर केले आहे व पुढील DPDC योजनेचे निधी करिता मंजूरीसाठी पाठविण्यात आले आहे. तसेच रोहित्र हलविण्याकरिता लागणारी मोकळी जागेसाठीचा अर्ज नगरपरिषदेकडे केल्याचे कागदापत्री पुरावा जोडलेला आहे. त्यामुळे झालेल्या दिरंगाई बाबत कर्मचा-यावर कारवाई करण्याबाबतची मागणी मंचास योग्य वाटत नाही. सदर कामी कुरुंदवाड नगरपरिषदेने भूखंड उपलब्ध करुन दिलेला आहे. तेथेच रोहित्र बसविण्यात यावा. हा रोहित्र स्थलांतरासाठी निधी उपलब्धीसाठी सर्वस्तरावर प्रयत्न व्हावेत असे मंचास वाटते.

९) ग्राहकाने सदरच्या जागेवर रोहित्र असताना सुध्दा सदरचा प्लॉट विकत घेतला आहे व नंतर झालेल्या मानसिक त्रासाबद्दल वि.प. तर्फे नुकसान भरपाईची मागणी करणे हे या मंचास योग्य वाटत नाही.

## आदेश

१) ग्राहकाच्या जागेवर असलेला रोहित्र निधी मंजूर झाल्यानंतर त्वरीत स्थलांतरीत करण्यात यावा.

२) ग्राहकाची नुकसान भरपाईची मागणी फेटाळण्यात येत आहे.

३) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM, KOLHAPUR
MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO.
महावितरण

४) या निर्णयाविरुध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा. बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स,बांद्रा (पूर्व) मुंबई यांजकडे करता येईल

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.

दिनांक ०१.०७.२०१७ पासून अध्यक्ष पद रिक्त आहे.

(श्री प्र. स. बुरांडे)
ग्राहक सदस्य

12.10.2016
(प्र.वि. खपली)
सदस्य सचिव

CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM, KOLHAPUR ZONE
MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD.
महावितरण